एसटी महामंडळाच्या सेवेत लवकरच पाच हजार बस

मुंबई : महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या सेवेत लवकरच टाटा मोटर्सच्या पाच हजार बसेस दाखल होणार आहेत. या बस खरेदीची निविदा प्रक्रिया पार पडली असल्याची माहिती परिवहनमंत्री प्रताप सरनाईक यांनी दिली. नव्या बसच्या माध्यमातून एसटीची सेवा अधिक सक्षम करण्याचा संकल्प करण्यात आला असल्याचे त्यांनी सांगितले.

या निविदा प्रक्रियेत सर्वांत कमी दराचा देकार टाटा मोटर्सने सादर केला. त्यामुळे बसच्या गुणवत्तेबाबत कोणतीही तडजोड केली जाणार नाही, असा विश्वास मंत्री सरनाईक यांनी व्यक्त केला. पुढील सहा महिन्यांत सुमारे पाच हजारहून अधिक जुन्या बस प्रवासी सेवेतून कालबाह्य होणार आहेत. जुन्या व गळक्या तसेच प्रवासादरम्यान बस बंद पडण्याच्या समस्येवरही नव्या ताफ्यामुळे मात करता येणार आहे.

मुंबईत ३५०हून अधिक कृत्रिम तलाव

न्यायालयाच्या आदेशानुसार लहान मूर्तींचे विसर्जन

लोकसत्ता प्रतिनिधी

मुंबई : पर्यावरणपूरक गणेशोत्सवाला प्रोत्साहन देण्यासाठी मुंबई महापालिकेने यंदा सहा फूट किंवा त्यापेक्षा कमी उंचीच्या श्रीमूर्तींच्या विसर्जनासाठी ३५० हून अधिक कृत्रिम तलावांची निर्मिती केली आहे. उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार यंदाही लहान मूर्तींचे विसर्जन कृत्रिम तलावांमध्ये केले जाणार असून, जलप्रदूषण रोखण्याच्या उद्देशाने पालिकेने ही सुविधा उपलब्ध केली आहे. मुंबईकरांचा वाढता प्रतिसाद लक्षात घेता कृत्रिम तलावांची संख्या दरवर्षी वाढवण्यात आली असून, २०२४ मधील २०४ आणि २०२५ मधील २९८ तलावांच्या तुलनेत यंदा ३५२ तलाव उभारले आहेत.

यंदा सर्वाधिक ३४ कृत्रिम तलाव 'के पश्चिम' विभागात तयार करण्यात आले असून, यात जुहू चौपाटी, अंधेरी स्पोर्ट्स कॉम्प्लेक्स, वर्सोवा जेट्टी आणि लोखंडवाला कॉम्प्लेक्स यांसारख्या प्रमुख ठिकाणांचा समावेश आहे. त्याखालोखाल डी विभागात २८, ई २३ आणि जी उत्तर विभागात २२ तलाव उभारले आहेत, तर सर्वात कमी म्हणजेच ३ तलाव बी विभागात आहेत. भाविकांना या तलावांची माहिती सहज मिळावी म्हणून महापालिकेने क्यूआर कोड विकसित केला असून पालिकेच्या संकेतस्थळावरही विभागनिहाय यादी उपलब्ध केली आहे.

आगमन-विसर्जनासाठी महापालिका सज्ज

पर्यावरणपूरक गणेशोत्सवाला प्रोत्साहन देण्यासाठी पालिकेने मूर्तिकारांना शाडूची माती आणि पर्यावरणपूरक रंग उपलब्ध केले. तसेच, रस्त्यांवरील खड्डे बुजवण्यावरही विशेष भर दिला आहे. त्याबरोबरच रस्त्यालगतच्या झाडांची आवश्यकतेनुसार छाटणी करून वाहतुकीस तसेच नागरिकांना ये-जा करण्यास अडथळा निर्माण होणार नाही, याचीही दक्षता घेण्यात आली आहे.

गणेशोत्सवादरम्यान 'मेट्रो' उशिरापर्यंत

मुंबई : गणेशोत्सवात मुंबईत धावणाऱ्या सहाही मेट्रो मार्गिकांच्या सेवा कालावधीत रात्रीच्या वेळेस वाढ करण्यात आली आहे. त्यानुसार १४ ते २५ सप्टेंबरदरम्यान सहा मेट्रो मार्गिकांवर रात्री उशिरापर्यंत गाड्या धावणार आहेत.

गणेशोत्सवादरम्यान विविध गणेश मंडळांना भेटी देणाऱ्या भाविकांना रात्री उशिरा घरी परतणे सोपे व्हावे वा गणेश मंडळांना भेटी देण्यासाठी पोहोचता यावे यासाठी मेट्रो मार्गिकांच्या सेवा कालावधीत वाढ करण्याची मागणी होत होती. त्यानुसार मुंबई मेट्रो वन प्रायव्हेट लिमिटेडने (एमएमओपीएल) वर्सोवा-अंधेरी-घाटकोपर मेट्रो-१, मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशनने (एमएमआरसी) आरे ते कफ परेड भुयारी मेट्रो-३, तर मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने (एमएमआरडीए) दहिसर ते काशीगाव मेट्रो-९ (टप्पा-१), मंडाले ते चेंबूर मेट्रो-२ ब (टप्पा १), दहिसर ते गुंदवली मेट्रो-७ आणि दहिसर ते अंधेरी पश्चिम (डीएन नगर) मेट्रो-२ अ मार्गिकेच्या सेवा कालावधीत रात्रीच्या वेळेस वाढ केली आहे. तर मेट्रो-२ अ, २ ब टप्पा-१, ९ टप्पा-१ आणि ७ मार्गिकेच्या अतिरिक्त फेऱ्यांमध्येही वाढ केली आहे.

नाटक सिनेमा वाद्यवृंद

गणेश चतुर्थीच्या शुभेच्छा!
शुक्र २५ दु.३.३० प्र.ठाकरे, बोरीवली
शनि २६ दु.३.३० श्रीशिवाजी मंदिर, दादर
रवि २७ दु.४.३० आ.अत्रे, कल्याण
मंगळ २९ दु.४ दीनानाथ, पार्ले
Ph. booking 9987820805 | Online BookMyShow
क्रिएटीज क्रिएशन्स + रंगाइ निर्मित
अमृता सुभाष सादर करीत आहे
असेन मी... नसेन मी...
लेखक संदेश कुलकर्णी
दिग्दर्शक अमृता सुभाष
सूत्रधार दिगंबर प्रभु

online tkts- bookmyshow Phn Bkng 75061 96060
रवि २७ दु.४.३० वा. क्रां.वासुदेव फडके, पनवेल
गणपती बाप्पा मोरया
अनामय निर्मित
ऑल द बेस्ट
लेखक दिग्दर्शक देवेंद्र पेम
मयुरेश पेम, निखिल चव्हाण, जुई बेंडखळे, मनमीत पेम

।। गणपती बाप्पा मोरया ।।
online tickets- bookmyshow
शनि २६ दु.४ विष्णुदास भावे, वाशी
रवि २७ दु.४ यशवंत नाट्य मंदिर, माटुंगा
लग्न पंचमी
विदुला चौगुले, सुनील अभ्यंकर, मधुगंधा कुलकर्णी आणि स्वप्नील जोशी

।। गणपती बाप्पा मोरया ।।
online tkt- bookmyshow
Phn bkng 97734 17776
रवि २७ रात्रौ ८.०० वा. श्री शिवाजी मंदिर, दादर
२१ हिंदू कॉलनी, दादर
२ ऑक्टो. सकाळी ११ दीनानाथ, पार्ले
धि गोवा हिंदू असोसिएशन निर्मित
सुभेदार गेस्ट हाऊस
लेखक- शिरीष देखणे दिग्दर्शक- विजय केंकरे
प्रायोजक- NKGSB Co-operative Bank Ltd.

।। गणपती बाप्पा मोरया ।।
online tkt- bookmyshow Phn Bkng 9920310180
रवि २० दु.४ कालिदास नाट्य मंदिर, मुलुंड
ति.वि. दि. १७पासून थिएटर सुरू
रवि २७ दु.४ प्रबोधनकार ठाकरे, बोरिवली
भूमिका प्रवेश अस्मय निर्मित
रत्नाकर मतकरी लिखित
एकदा पहावं करून
दिग्दर्शक विजय केंकरे

रसिक प्रेक्षकांना गणेशोत्सवाच्या शुभेच्छा!
रंगमाया + अष्टविनायक निर्मित
मुक्ता बर्वे सादर करीत आहे
पुन्हा नक्की भेटू!
PUNHAA NAKKII BHETU
लवकरच रंगभूमीवर...
लेखक- देवू बर्वे दिग्दर्शक- मीरा वेलणकर
नेपथ्य, प्रकाशयोजना- प्रदीप मुळ्ये
कलाकार- प्रियदर्शन जाधव, अंशुमन विचारे, आरती वडगबाळकर आणि मुक्ता बर्वे

।। गणपती बाप्पा मोरया ।।
online tkt- bookmyshow Phn Bkng 9920310180
शनि २६ दु.४ दीनानाथ नाट्यगृह, पार्ले
रवि २७ दु.४ रवींद्र नाट्य मंदिर, प्रभादेवी
अंकित काणे सादर करीत आहे
भूमिका अस्मय निर्मित
धुमशान भेटले
चेतना भट, विजय पटवर्धन, सचिन वळंजू, वरद चव्हाण, अजिंक्य भोसले, अंकित म्हात्रे, कांचन प्रकाश, पूजा गोरे वर्तक, अर्चना शर्मा, प्रकाश कवळे आणि संजय नार्वेकर

।। गणपती बाप्पा मोरया ।।
आमने सामने
नाटकाच्या अभूतपूर्व यशानंतर...
लीना भागवत - मंगेश कदम यांचे नाजुक विषयावरचं 'कडक' नाटक!
नाटकमंडळी निर्मित
प्रश्न थोडा नाजुक आहे
लेखक- मिहिर राजदा
दिग्दर्शक- अद्वैत दादरकर
नेपथ्य- प्रदीप मुळ्ये संगीत- विजय गवंडे
कार्यकारी निर्माता- दिगंबर प्रभू निर्माता- मंगेश कदम
लवकरच रंगभूमीवर...

online tickets- bookmyshow
गुरु २४ दु.३.४५ विष्णुदास भावे वाशी
शुक्र २५ सायं.४.४५ यशवंतराव चव्हाण, कोथरुड
शनि २६ सायं.४.४५ बालगंधर्व रंगमंदिर, पुणे
रवि २७ सायं.४.४५ अण्णाभाऊ साठे, पद्मावती
मंगळ २९ दु.३.३० प्रबोधनकार ठाकरे बोरिवली
कॅनडा दौरा (३ ऑक्टो. कॅलगरी, ४ ऑक्टो. टोरांटो, ११ ऑक्टो. व्हॅंकुव्हर)
बाप्पाच्या आशीर्वादाने मी पुन्हा प्रयोग करायला सज्ज!
लवकरच भेटूया...
आमने सामने
नाटकमंडळी निर्मित
मंगेश कदम, लीना भागवत

लीना भागवत सादर करीत आहे
विवेक बेळे लिखित
मंगेश कदम दिग्दर्शित
प्रेमाच्या त्रिकोणामागे दडलेल्या राजकारणाचा बेभान धुडगूस..!!
सोनिया प्रॉडक्शन्स निर्मित
माकडाच्या हाती शॅम्पेन
ताज्या दमाच्या, एनर्जेटिक जेन्झी कलाकारांसोबत लवकरच रंगभूमीवर..!

IDEMI
GOVERNMENT OF INDIA
Ministry of Micro, Small and Medium Enterprises
INSTITUTE FOR DESIGN OF ELECTRICAL MEASURING INSTRUMENTS, MUMBAI
वैद्युतिक मापन उपयंत्र अभिकल्प संस्थान, मुंबई
Government Certificate Course on Artificial Intelligence for Finance ,Trading and Stock Market
Sessions include hands on practice
Course Timing- 7.00 pm to 9.00 pm
Course Duration 5 Days
आनलाइन ONLINE
Course Date- 21 to 25 Sept 2026
Email id : training@idemi.org Web : www.idemi.org Ph.: (022) 2405 0301/2/3/4
introduction to Ai and models, using Ai for - company fundamental & technical analysis, stock valuation, quantitative and algorithmic trading, developing and integrating prediction strategies, risk and portfolio management, statistical modeling, economic interpretation, financial analysis and valuation, RBI, SEBI norms
Fees- 3500+18 % GST (fees are not refundable)
After successful completion, certificate will be issued
For whom- Traders, Portfolio Managers, Financial Analysts, Investment Bankers, Risk Managers, Wealth Managers & Advisors, Data Scientists in Finance, Fintech Entrepreneurs, Regulators & Compliance Officers, Students of Finance/Economics
Call us between 10 am to 6 pm
Contact- -9403566219 ,8007765693,8291413843

ठाणे महानगरपालिका, ठाणे

सार्वजनिक आरोग्य विभाग

जाहीर आवाहन

ठाणे महानगरपालिकेच्या हद्दीत ज्या अनुज्ञप्ती धारकांना ठाणे महानगरपालिकेत मोठी जनावरे (म्हैसवंश) व लहान जनावरे (शेळ्या, मेंढ्या) अधिकृत कत्तलखान्यात कापणे व खाजगी जागेत सर्व मांस विक्री करणारी दुकाने दरवर्षी प्रमाणे जैन धर्मियांचे पर्युषण संवत्सरी निमित्त मंगळवार, दिनांक १५/०९/२०२६ रोजी बंद ठेवण्याचे जाहीर आवाहन करीत आहोत. तरी सर्व मांस विक्रेत्यांनी याची नोंद घ्यावी.

ठामपा/पिआरओ/आरोग्य/५२३/२०२६-२७
दि:११.०९.२०२६

सही/-
उप-आयुक्त (आरोग्य)
ठाणे महानगरपालिका, ठाणे

Pls visit our oficial web-site www.thanecity.gov.in

अनधिकृत बांधकामाला आळा घाला..
अनधिकृत बांधकाम दिसल्यास प्रभाग समितीत तक्रार करा !

जाहीर सूचना

याद्वारे सूचना देण्यात येत आहे की, आमच्या अशिलांनी आम्हाला **सर्व्हे क्रमांक** ४७/२ धारक जमिनीचा सर्व तो भाग व भूखंड, एकूण मोजमापित ८,३५० चौरस मीटर, गाव आपटी, तालुका खालापूर, जिल्हा रायगड या जमिनीसंदर्भात (''**सदर जमीन**'') मालकांचे हक्क, अधिकार व हितसंबंधांची चौकशी करण्याचे निर्देश दिले आहेत. आमचे अशील हे मालक **दिनेश कुमार जैन** (''**मालक**'') यांच्याकडून सदर जमिनीच्या खरेदीसाठी बोलणी करीत आहेत. कोणाही व्यक्तीचा सदर जमिनीविरोधात वा संदर्भात वा मालकांविरोधात कोणताही एफएसआय वा संभाव्य विकासासंदर्भात विक्री, हस्तांतरण, विकास हक्क, विनिमय, अभिहस्तांकन, भाडेकरार, उप-भाडेकरार, वहिवाट, उप-वहिवाट, लिव्ह अँन्ड लायसेन्स, देखभाल तत्वावर, गहाण, वारसा, हिस्सा, भेट, इच्छा, निधन, धारणाधिकार, प्रभार, देखभाल, सुविधाधिकार, न्यास, इच्छापत्र, मृत्यूपश्चात वारसा, लाभार्थी, ताबा, विमोचन, परित्याग वा अन्य कोणत्याही स्वरूपात वा कोणताही करार, व्यवहार, दस्तावेज, लिखापढी, अभिहस्तांकन, विकास करार, सामंजस्य करार, हेतूपत्र, मृत्यूपश्चात वारसा, वारसका, कुटुंब व्यवस्था/तडजोड, कोणत्याही विधि न्यायालयाचा दावाखटला, निवाडा वा न्यायालयीन आदेश, कोणतेही कंत्राटे, कोणतेही करार, भार वा अन्य कोणत्याही स्वरूपात कोणताही कोणताही हिस्सा, हक्क, अधिकार, संपत्ती, दावा, हरकत, मागणी व /वा हितसंबंध असल्यास, त्यांनी त्यासंदर्भात कागदोपत्री पुराव्यासहित अधोहस्ताक्षरितांना सदर सूचनेच्या प्रसिद्धी दिनांकापासून **१४ (चौदा)** दिवसांच्या आत लिखित स्वरूपात व ई-मेलद्वारे **patilmanojt22@gmail.com** येथे सूचित करावे अन्यथा असा कोणताही दावा, हक्क, अधिकार, संपत्ती वा हितसंबंध हे आमच्या अशिलांद्वारे दुर्लक्षित केले जातील व ते अधित्यागित व/ वा परित्यागित समजले जातील व आमचे अशील हे सदर व्यवहार पूर्ण करण्याची प्रक्रिया करतील.

ॲडव्होकेट मनोज तुकाराम पाटील
दिनांक : १४ सप्टेंबर, २०२६

हार्दिक प्रॉपर्टीज
खालापूर न्यायालयाजवळ
गाव खालापूर, जिल्हा रायगड,
महाराष्ट्र – ४१०२०३.

प्रसादित्य एआरसी लिमिटेड

पूर्वीची प्रिदवी ॲसेट रिकन्स्ट्रक्शन अँड सिक्युरिटायझेशन कंपनी लिमिटेड

श्री. राजेन ध्रुव यांच्या खात्यातील तारण ठेवलेल्या मालमत्तेची विक्री

स्थावर मालमत्तेच्या विक्रीसाठीची विक्री सूचना

(सुरक्षा हितसंबंध (अंमलबजावणी) नियम, २००२च्या नियम ८(६)च्या तरतुदीचा संदर्भ घ्या)
सिक्युरिटायझेशन अँड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल असेट्स अँड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, २००२ अंतर्गत स्थावर मालमत्तेच्या विक्रीसाठी ई-लिलाव विक्री सूचना, सुरक्षा हितसंबंध (अंमलबजावणी) नियम, २००२च्या नियम ८(६) आणि ९(१)च्या तरतुदीसह वाचलेली.

याद्वारे सर्वसामान्य जनतेला आणि विशेषतः कर्जदार आणि जामीनदारांना सूचना देण्यात येत आहे की, मे. प्रसादित्य एआरसी लिमिटेड (पीएआरसी) (पूर्वीचे नाव प्रिधवी ॲसेट रिकन्स्ट्रक्शन अँड सिक्युरिटायझेशन कंपनी लिमिटेड), (''सुरक्षित धनको'') यांच्याकडे गहाण ठेवलेली आणि जिचा रचनात्मक ताबा सुरक्षित धनकोच्या प्राधिकृत अधिकाऱ्याने घेतला आहे, अशी खाली सही करणाऱ्या व्यक्तीद्वारे सरफेसी कायद्याच्या तरतुदींनुसार, सुरक्षित धनकोस देय असलेल्या खालील रकमेच्या वसुलीसाठी, खाली नमूद केलेल्या तारखेला, वेळेला आणि ठिकाणी, **''जेथे जशी आहे तशी'', ''तेथे जे काही आहे ते'' आणि ''जे काही असेल ते''** या तत्त्वावर ऑनलाइन सार्वजनिक लिलावाद्वारे विक्री केली जाईलः

अनु. क्र.	कर्ज खाते क्रमांक	दिनांक १७.०८.२०२६ रोजीनुसार एकूण थकबाकी	टीडीएस प्रलंबित	दिनांक १७.०८.२०२६ रोजीची एकूण रक्कम
१.	S000242642	१७१,७२,६७,३९५/-	२२,१३,४९२/-	१,७१,९४,८०,८८७/-
२.	S000242543	१८०,७४,३९,४८६/-	१,३०,९१,६१८/-	१,८२,०५,३१,१०४/-
एकूण		३५२,४७,०६,८८१/-	१,५३,०५,११०/-	३,५४,००,११,९९१/-

वरील तक्त्यामध्ये नमूद केलेली रक्कम, कर्ज करार आणि इतर दस्तऐवजांनुसार दिनांक **१८.०८.२०२६** पासून लागू होणाऱ्या भविष्यातील व्याजासह, कायदेशीर खर्च आणि इतर शुल्कांसह, दिनांक **१७.०८.२०२६** पर्यंतची थकबाकी मुद्दल, थकबाकी आणि व्याजापोटी संबंधित कर्ज खात्यांमध्ये प्रलंबित आहे.

सम्मान कॅपिटल लिमिटेड (एससीएल) (पूर्वीचे इंडिया बुल्स हाऊसिंग फायनान्स लि.)द्वारे **कर्ज खाते क्रमांक S000242642 आणि S000242543** हे कर्ज दस्तऐवजांनुसार व्याज आणि अंतर्निहित प्रतिभूतींसह दिनांक ३१.१२.२०२५ च्या हस्तांतरण करारानुसार सुरक्षित कर्जदाराकडे हस्तांतरित करण्यात आले, ज्यानुसार सुरक्षित कर्जदाराने एससीएलची जागा सुरक्षित कर्जदार म्हणून घेतली आहे.

स्थावर तारण मालमत्तेचे वर्णनः

खालीलप्रमाणे जमिनीचे/ मालमत्तेचे सर्व तुकडे किंवा भूखंड, त्यावरील सर्व वर्तमान आणि भविष्यातील एफएसआय आणि त्यावर स्थापित/ स्थापित करावयाची आणि/ किंवा बांधलेली/ बांधली जाणारी सर्व वर्तमान आणि/ किंवा भविष्यातील संरचना, इमारती, फर्निचर, फिक्स्चर्स, फिटिंग्ज, स्थायी आणि/ किंवा प्लांट व मशिनरी आणि त्यामधील श्री. राजेन वसंत ध्रुव यांचे सर्व वर्तमान आणि/ किंवा भविष्यातील हक्क, मालकी आणि/ किंवा हितसंबंध, लाभ, दावे, मागण्या आणि/ किंवा अधिकार यांसहः

१) मुंबई शहर आणि मुंबई उपनगर या नोंदणी उप-जिल्ह्यात आणि जिल्ह्यात, अंधेरी तालुक्यात, विले पार्ले गावात स्थित, सर्व्हे क्रमांक ११४, हिस्सा क्रमांक १९, संबंधित सीटीएस क्रमांक २०९९, क्षेत्रफळ ६५१ चौ. मीटर असलेली जमीन, श्री. राजेन वसंत ध्रुव यांच्या मालकीची. कडा आणि सीमाः **उत्तरेलाः** वेस्टर्न एक्सप्रेस हायवे आणि विले पार्ले गावातील (पूर्वेकडील) सीटीएस क्रमांक २००८ (भाग); **पूर्वेलाः** विले पार्ले गावातील (पूर्वेकडील) सीटीएस क्रमांक २००९ आणि २०९९ए; **पश्चिमेलाः** विले पार्ले गावातील (पूर्वेकडील) सीटीएस क्रमांक २००८ (भाग) आणि २०९९सी; आणि; **दक्षिणेलाः** विले पार्ले गावातील (पूर्वेकडील) सीटीएस क्रमांक २००९ आणि २०९९डी.

२) सर्व्हे क्रमांक ११४, हिस्सा क्रमांक १९, संबंधित सीटीएस क्रमांक २००८ आणि २००८/१ असलेले २४५.५२ चौ. मीटर क्षेत्रफळाचे भूखंड, मुंबई शहर आणि मुंबई उपनगर या नोंदणी उप-जिल्ह्यात आणि जिल्ह्यात, अंधेरी तालुक्यात, विले पार्ले गावात स्थित, श्री. राजेन वसंत ध्रुव यांच्या मालकीची. कडा आणि सीमा खालीलप्रमाणेः उत्तरः वेस्टर्न एक्सप्रेस हायवे; **पूर्वः** विले पार्ले (पूर्व) गावातील सीटीएस क्रमांक २००८ असलेले भूखंड; **पश्चिमः** विले पार्ले (पूर्व) गावातील सीटीएस क्रमांक २००८ असलेले भूखंड; आणि **दक्षिणः** विले पार्ले (पूर्व) गावातील सीटीएस क्रमांक २००८ असलेले भूखंड.

३) सर्व्हे क्रमांक ११४, हिस्सा क्रमांक ३५ (भाग) संबंधित सीटीएस क्रमांक २०९९डी (भाग) क्षेत्रफळ ४७७ चौ.मी., विले पार्ले गाव, तालुका अंधेरी, मुंबई शहर आणि मुंबई उपनगर नोंदणी उप-जिल्हा आणि जिल्हा, श्री. राजेन वसंत ध्रुव यांच्या मालकीची, कडा आणि सीमाः **उत्तरेलाः** विले पार्ले गाव (पूर्व) येथील सीटीएस क्रमांक २०१०, २०९९सी, २०९९बी आणि २०९९ए असलेली जमीन; **पूर्वेलाः** अंशतः नाल्याने, अंशतः विले पार्ले गाव (पूर्व) येथील सीटीएस क्रमांक २०९९ए असलेल्या जमिनीने; आणि **पश्चिमेलाः** विले पार्ले गाव (पूर्व) येथील सीटीएस क्रमांक २०९९ई असलेल्या जमिनीने; आणि **दक्षिणेलाः** विले पार्ले गाव (पूर्व) येथील सीटीएस क्रमांक २०९९एफ असलेल्या जमिनीद्वारे आणि अंशतः विमानतळाच्या जमिनीला लागून असलेल्या नाल्याद्वारे. एकूण क्षेत्रफळः- १३७३.५२ चौ. मीटर.

विक्रीच्या सविस्तर अटी व शर्तींसाठी, कृपया मे. प्रसादित्य एआरसी लिमिटेडच्या वेबसाइटवर म्हणजेच www.paras.org.in/tenders येथे दिलेल्या लिंकचा संदर्भ घ्या.

अनुसूचीतील मालमत्तेची/ मालमत्तांची विक्रीसेवा प्रदात्याच्या http://www.bankeauctions.com या वेबसाइटद्वारे ''ऑनलाइन-लिलाव विक्री'' पद्धतीने आयोजित केली जाईल. ई-लिलावाची तारीख, बोली अर्ज सादर करण्याची अंतिम तारीख, राखीव किंमत, बयाणा रक्कम, बोली वाढीची रक्कम आणि ई-लिलावाची वेळ यांचा तपशील खाली नमूद केला आहे.

लिलावाची तारीख	आयटम क्र.	लॉट	राखीव किंमत	इसारा रक्कम ठेव	वाढीव बोली	लिलावाची वेळ
१४.१०.२०२६	१ ते ३	एक लॉट	४८.५० कोटी रुपये	रु. ४.८५ कोटी	रु. १०,००,०००/-	दुपारी १२.०० ते दुपारी १.००

* ई-लिलावाची वेळ - प्रत्येक ५ मिनिटांच्या स्वयंचलित मुदतवाढीच्या कलमासह, म्हणजेच, लिलाव बंद होण्यापूर्वी बोली लावल्यास ई-लिलावाची समाप्ती वेळ प्रत्येक ५ मिनिटांनी वाढवली जाईल.

सेवा प्रदात्याच्या https://www.bankeauctions.com या वेबसाइटद्वारे ''ऑनलाइन ई-लिलावात'' सहभागी होण्यासाठी जनतेला आमंत्रित केले जात आहे. सेवा प्रदात्याचा पत्ता खालीलप्रमाणे आहेः -

मे. सी1 इंडिया प्रा. लि., संपर्क व्यक्तीः (१) श्री. धरणी कृष्णा, संपर्क क्रमांक ९९४८१८२२२२, ई-मेल आयडीः (१) dharani.p@c1india.com आणि (२) andhra@c1india.com

इच्छुक सहभागी/ बोली लावणाऱ्यांना ई-लिलाव विक्रीच्या सविस्तर अटी व शर्तींसाठी **https://www.bankeauctions.com आणि www.paras.org.in/tenders** या वेबसाइट्स पाहण्याचा सल्ला दिला जातो. तसेच, त्यांचे बोली अर्ज सादर करण्यासाठी आणि ई-लिलाव विक्रीच्या कार्यवाहीत भाग घेण्यासाठी, ऑनलाइन नोंदणी, युझर आयडी, पासवर्ड, मदत, कार्यपद्धती, ई-लिलावाबद्दल ऑनलाइन प्रशिक्षण इत्यादींसाठी सेवा प्रदात्याशी संपर्क साधणे आवश्यक आहे.

इच्छुक सहभागींनी ईएमडी रक्कम आरटीजीएस/ एनईएफटी/ फंड्स ट्रान्सफरद्वारे सुरक्षित कर्जदाराच्या खाली नमूद केलेल्या ई-लिलाव संकलन खात्यात जमा करावीः

खाते क्र.	100631100000229
सुरक्षित कर्जदार	मे. प्रसादित्य एआरसी लिमिटेड (पीएआरसी)
बँक	युनियन बँक ऑफ इंडिया
शाखा	मिड कॉर्पोरेट शाखा - पुंजागुट्टा हैदराबाद
आयएफएससी कोड	UBIN0577901

इच्छुक बोलीदारांना सूचित करण्यात येते की त्यांनी आवश्यक तपशिलांसह, उदा. ईएमडी जमा केल्याचा पुरावा, पॅनकार्ड, आधार, पत्ता आणि ओळखपत्र, वरील लिलाव तक्त्यामध्ये नमूद केलेल्या अंतिम तारखेपर्यंत किंवा त्यापूर्वी बोली अर्ज ऑनलाइन सादर करावेत.

इच्छुक निविदाकारांनी रीतसर भरलेल्या निविदा अर्जाची हार्ड कॉपी, वरील कागदपत्रांच्या स्वयं-साक्षांकित प्रतींसह, नोंदणीकृत टपाल/ स्पीड पोस्ट/ कुरियरद्वारे खालील पत्त्यावर, **दिनांक १३.१०.२०२६ रोजी सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत** पोहोचेल अशा प्रकारे पाठवावीः **श्री. के. व्ही. रामकृष्ण प्रसाद,** प्राधिकृत अधिकारी, मे. प्रसादित्य एआरसी लिमिटेड, दरवाजा क्र. १-५५, चौथा मजला, 'राजा प्रसादमू', मस्जिद बांदा रोड, कोंडापूर, हैदराबाद - ५०००८४. टपालातील विलंब विचारात घेतला जाणार नाही.

इच्छुक बोलीदारांना असा सल्लाही देण्यात येत आहे की, ई-लिलावात सहभागी होण्यापूर्वी त्यांनी मालमत्तेला भेट द्यावी आणि मालमत्तेच्या तपशिलांविषयी तसेच संबंधित एस.आर.ओ. येथे तिच्या नोंदणी योग्यतेविषयी स्वतःची पूर्ण खात्री करून घ्यावी.

मालमत्तेच्या तपासणीची तारीख व वेळः ०६.१०.२०२६ रोजी सकाळी १०:०० ते दुपारी २:००च्या दरम्यान.

ई-लिलाव विक्रीअंतर्गत असलेल्या मालमत्तेच्या मालकी हक्काबाबत योग्य ती खबरदारी घेण्यासाठी आणि स्वतःची खात्री करून घेण्यासाठी, सविस्तर प्रश्न, अटी व शर्ती, मार्गदर्शन, अनुसूचीतील मालमत्तेची पाहणी, मालकी हक्काच्या कागदपत्रांच्या प्रती आणि नवीनतम बोजा प्रमाणपत्रांचे अवलोकन करण्याकरिता, कृपया **श्री. के. व्ही. रामकृष्ण प्रसाद,** अधिकृत अधिकारी, मोबाईल क्रमांक ९६५२२५००४४ यांच्याशी संपर्क साधा.

वर नमूद केलेला लिलाव कोणत्याही कारणास्तव अयशस्वी झाल्यास, सरफेसी कायदा, २००२च्या तरतुदींनुसार खाजगी कराराद्वारे या सूचनेद्वारे लिलावाखालील तारण ठेवलेल्या मालमत्ता विकण्याचा अधिकार पीएआरसीला आहे.

ही राजेन वसंत ध्रुव, मिड-सिटी प्रोजेक्ट्स एलएलपी (त्यांच्या भागीदारांमार्फत) आणि मिड-सिटी लँडमार्क एलएलपी (त्यांच्या भागीदारांमार्फत) यांच्या कर्जदार/ गहाण ठेवणारे/ जामीनदारांना, उपरोक्त नमूद तारखेला होणाऱ्या विक्रीसंदर्भात आणि इतर तपशिलांबाबतची सूचना आहे.

दिनांकः ०८.०९.२०२६, ठिकाणः हैदराबाद. **सही/- अधिकृत अधिकारी**